राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.४/का.६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
दिनांक :- ०७/०२/२०१५.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा प्रशासन **अधिकारी**,
सर्व मुख्याधिकारी, नगर **परिषदा** /नगर पंचायतीं.

**विषय** :- **नगर परिषदा** नगर पंचायतींच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका **सन २०११** च्या जनगणनेनुसार प्रगणक गट दर्शविणारा **गुगल अर्थ**वरील नकाशा तयार करण्याबाबत...

महोदय,

नगरपरिषदा / **नगर पंचायतींच्या** आगामी होणा-या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचनेची प्रक्रिया **संगणकाच्या माध्यमातून** करण्यात येणार आहे. याकरिता मुख्याधिकारी यांनी पुढील कार्यपध्दती **अवलंबावी** :-

(१) जनगणना **कार्यालयाकडून** २०११ च्या जनगणनेचे प्रगणक गटांचे नकाशे व लोकसंख्या उपलब्ध **करून घेणे**.

(२) गुगल **अर्थ च्या नकाशावर सदर प्रगणक** गटांची मांडणी करणे.

(३) अशाप्रकारे **गुगल अर्थचे प्रगणक** गट मांडणी केलेल्या नकाशांचा वापर करून (KML फाईलसह) **महाऑनलाईनने** विकसित केलेल्या संगणक प्रणालीच्या माध्यमातून प्रभाग रचना **करून घेणे**.

(४) **महाऑनलाईनने विकसित केलेल्या** संगणक प्रणालीच्या माध्यमातून तयार केलेला प्रभाग रचनेचा नकाशा **तपासून ज्या ठिकाणी** बदल आवश्यक आहे त्या ठिकाणी योग्य ती कारणे देऊन त्या नकाशात **आवश्यक असलेले** बदल करणे.

D:\Corpn २०१४-१५\Election २०१४-१५ Feb..docx

(५) असे योग्य ती कारणमिमांसा देऊन बदल केलेल्या नकाशांच्या आधारे प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव तयार करून वर्गवारीनुसार संबंधित कार्यालयांकडे सादर करणे.

(६) वर्गवारीनुसार संबंधित कार्यालयांनी मान्यता दिल्यानंतर आरक्षित प्रभागांची सोडत काढणे.

(७) प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करून त्यावर हरकती व सूचना मागविणे.

(८) प्रारुप प्रसिध्दीच्यावेळी वेब साईटवर वर्गवारीनुसार संबंधित कार्यालयांनी प्रमाणित केलेले गुगलच्या इमेजवरील प्रभागांचे नकाशे नागरिकांच्या माहितीकरिता उपलब्ध ठेवणे.

(९) हरकती व सूचनांवर सुनावणी.

(१०) सुनावणीमध्ये झालेल्या निर्णयास अनुसरुन प्रभागांच्या हद्दीमध्ये बदल करणे.

(११) अंतिम प्रभाग रचना अधिसूचित करणे.

(१२) अंतिम प्रभाग रचनेचे वर्गवारीनुसार संबंधित कार्यालयांनी प्रमाणित केलेले गुगल इमेजवरील प्रभागांचे नकाशे वेब साईटवर ठेवणे.

वरीलप्रमाणे प्रभाग रचना तयार करण्याकरिता गुगल अर्थच्या सन २०११ च्या नकाशावर प्रगणक गटांची मांडणी विशिष्ट प्रकारे करावयाची आहे. याकरिता सविस्तर प्रक्रिया सोबत जोडली आहे. त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करून प्रगणक गट मांडणीचे काम नगर परिषदा / नगर पंचायतींच्या मुदत समाप्तीपूर्वी दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत पूर्ण करण्यात यावे. या कामाचे संनियंत्रण संबंधित जिल्हाधिकारी यांचेवर सोपविण्यात येत आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
प्र.उपआयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र